मा(ब्रा)उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे "श्री. वि.वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा दि.२७ फेब्रुवारी हा जन्मदिन, "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्याबाबत" या विषयाचे शासन परिपत्रक क्रमांक बैठक-२४१३/(प्र.क्र.०४/१७)/समन्वय, दिनांक २०.१.२०१७ ची प्रत सोबत जोडत आहे.

— · — · — · — · — · — · —

क्रमांक : १६/संकीर्ण/२०१७/शा३०३
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१.

दिनांक : 10 FEB 2017

प्रति,

पृष्ठांकन क्र.विकाऔ/शिक्षण/२०१७/६८१
दिनांक :- 21 FEB 2017

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, श्री.वि.वा.शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा दि.२७ फेब्रुवारी हा जन्मदिन, मराठी भाषा गौरव दिन म्हणुन साजरा करण्यात यावा तसेच उपरोक्त शासन परिपत्रकांत दिलेल्या सुचना नुसार संसथास्तरावर कार्यक्रम आयोजित करून कार्यवाही करण्यात यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

सोबत :- १. महाराष्ट्र शासन परिपत्रक.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना प्रत देण्यात येवून सुचित करण्यात येते की, सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

श्री. वि. वा शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा दि.२७ फेब्रुवारी हा जन्मदिन, " मराठी भाषा गौरव दिन " म्हणून साजरा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः बैठक -२४१३/(प्र.क्र.०४/१७)/समन्वय
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २० जानेवारी, २०१७.

शासन परिपत्रक -

श्री.वि.वा.शिरवाडकर, उर्फ कुसुमाग्रज यांनी मराठी भाषेच्या साहित्य क्षेत्रामध्ये अत्यंत मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषेला मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहे. त्याचाच एक भाग म्हणून व मातृभाषेचा गौरव म्हणून श्री. वि.वा.शिरवाडकर, उर्फ कुसुमाग्रज यांचा दि.२७ फेब्रुवारी हा जन्मदिन " मराठी भाषा गौरव दिन " म्हणून सन २०१३ पासून साजरा करण्यात येतो.

२. दि.२७ फेब्रुवारी, २०१७ रोजी मराठी भाषा गौरव दिन म्हणून हा दिवस मोठया प्रमाणावर साजरा करण्यासाठी काय उपाययोजना करता येतील व त्यामध्ये कोणकोणत्या विभागाचा प्रत्यक्ष समावेश राहिल व कोणत्या विभागाने निश्चित कोणते उपक्रम राबवावेत याबाबतची पूर्वतयारी करण्यासाठी मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, शालेय शिक्षण, सांस्कृतीक कार्य इत्यादी ) यांनी दि.१३ जानेवारी, २०१७ रोजी बालभवन, चर्नी रोड, मुंबई येथे बैठकीचे आयोजन केले होते. सदरहू बैठकीत इतर अनेक विषयावर चर्चा झाली. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने " मराठी भाषा गौरव दिन " खालील नमूद केल्याप्रमाणे तसेच परिशिष्ट " अ " नुसार साजरा करण्यात यावा असे ठरविण्यात आले :-

१) मराठी भाषेचा उगम, विकास, समृध्दी, भवितव्य तसेच सदरहू भाषेचा प्रचार, प्रसार व संवर्धन विद्यापीठ/महाविद्यालयातील शिक्षक/विद्यार्थी यांनी लेख लिहून तो मराठी विकीपिडीयावर उपलब्ध करण्यात यावा.

शा. ३०३
२०/०१/२०१७

६) मराठी भाषा/साहित्य कोष वाङ्मय या विषयांवर व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा यांचे आयोजन तसेच तज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखतीचे आयोजन.

७) प्रचारमाध्यमे तसेच प्रशासनात मराठी भाषेचा वापर याबाबत व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादर करणे यांचे आयोजन.

८) युनिकोडप्रणित मराठी आणि इन्स्क्रिप्ट मराठी कळफलक संबंधीत विषयांवरील प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन.

९) समाजप्रसार माध्यमांतील ( सोशल मिडीया ) मराठी, माहिती तंत्रज्ञान व मराठी, माहजालावरील ( इंटरनेट ) मराठी या क्षेत्रांतील तज्ञांची व्याख्याने व सादरीकरणे यांचे आयोजन.

१०) कुसुमाग्रज व इतर सुप्रसिध्द थोर मराठी साहित्यिकांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन.

११) मराठी वर्णमालेबाबत सादरीकरण किंवा व्याख्याने यांचे आयोजन.

१२) बोली भाषांवरील कार्यक्रमांचे आयोजन ( व्याख्याने, चर्चासत्रे, सादरीकरणे... इ. )

१३) शब्दभांडार आणि नवीन पर्यायी शब्दनिर्मिती यांबाबतच्या स्पर्धा.

१४) म्हणी, वाक्प्रचार, प्राचीन शब्द यांची व्युत्पत्ती या विषयांवर रंजक व्याख्याने/ सादरीकरणे.

१५) मराठी सुलेखन, सुंदर मराठी हस्ताक्षर स्पर्धा व संबंधीत कार्यशाळांचे आयोजन.

१६) मराठी कविता, प्रसिध्द उतारे, मराठी भाषा विषयक घोषवाक्ये यांचे भित्तीचित्र प्रदर्शन किंवा स्पर्धेचे आयोजन

१७) मोडी लिपीचे प्रशिक्षण, व्याख्यान किंवा परिसंवादाचे आयोजन.

१८) मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणाऱ्या नि:स्पृह व्यक्ती व त्यांनी निर्माण केलेल्या संस्थांना किंवा प्रकल्पांना भेट देणे.

३. वरील उपक्रम करण्यासाठी भाडे इत्यादिसाठी येणारा खर्च विद्यापीठांनी त्यांच्या निधीमधून करावा.

४. सदरहू कार्यक्रम अकृषी विद्यापीठे / महाविद्यालयांच्या कॅम्पसबाहेर होणार असल्याने, शहरातील सांस्कृतिक सभागृहे / प्रांगण / ऐतिहासिक ठिकाणे/ चौक इत्यादि ठिकाणांचे / जागांचे कार्यक्रमासाठीचे आरक्षण विहित कालावधीपूर्वी करण्यात यावे. सह संचालक, उच्च शिक्षण व तंत्र

# परिशिष्ट " अ "

सांस्कृतिक कार्यक्रमाबाबत विचारात घ्यावयाचे मुद्दे.

१ त्या त्या विद्यापीठाने संबंधित शहरातील सर्वात मोठया सभागृहात किंवा योग्य त्या ठिकाणी भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करावे.

२ हा कार्यक्रम केवळ विद्यापीठ किंवा महाविद्यालयांसाठी नव्हे, तर संपूर्ण शहरासाठीचा असेल.

३ या कार्यक्रमासाठी विद्यापीठाने, गावातील / शहरातील साहित्यिक, अन्य कलाकार, सामाजिक-सांस्कृतिक संस्थांचे पदाधिकारी, सर्व लोकप्रतिनिधी, राजकीय मान्यवर, संपादक-पत्रकार, भाषातज्ञ, भाषाअभ्यासक, प्राध्यापक- विद्यार्थी आणि रसिक यांना निमंत्रित करणे अपेक्षित.

४ ठरलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातील कलाकारांची निवास व भोजनाची व्यवस्था ( गरजेनुसार ) करणे.

५ कार्यक्रमाचा योग्य तो प्रचार-प्रसार करणे. ( वृत्तपत्रीय जाहिराती, माहितीपत्रके, माहितीफलक ).

६ सांस्कृतिक कार्यक्रमात रंगमंचावर LED वॉलची व्यवस्था पुरवणे आणि आवश्यक ती नेपथ्य व्यवस्था पुरवणे.

७ कार्यक्रमाचे ३ कॅमेरांसह उत्तम छायाचित्रण करण्याची व्यवस्था करणे.

८ रंगमंचावर कुसुमाग्रजांची प्रतिमा अत्यावश्यक. ( दिनांक २७ फेब्रुवारी - मराठी भाषा गौरव दिन - कुसुमाग्रज जन्मदिन ).

९ सांस्कृतिक कार्यक्रमात योग्यवेळी (शक्यतो समारोपाच्या गाण्याआधी ) ४ पुरस्कार विजेत्यांवरील AVs ( २०-२५ मि. ) दाखविण्याची व्यवस्था.

इतर मुद्दे -

१ विद्यापीठ क्षेत्रातील सर्व प्रकारच्या महाविद्यालयांत " मराठी भाषा व साहित्य मंडळ " स्थापन करण्यासाठी पाठपुरावा करणे.

२ या मंडळांसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्याची व्यवस्था ( प्रामुख्याने दि.२७ फेब्रुवारी, दि.१५ ऑक्टोबर - वाचन प्रेरणा दिन व अन्य अनुषंगिक कार्यक्रमांसाठी ही आर्थिक तरतूद असेल. )

३ विद्यापीठ क्षेत्रातील सर्व महाविद्यालयांमध्ये मराठी भाषा गौरव दिनाचा यथोचित कार्यक्रम साजरा व्हावा.

४ शासन परिपत्रक व संबंधित उपक्रम सूची प्रत्येक महाविद्यालयापर्यंत पोहोचविणे आवश्यक.

५ केवळ मराठी भाषा विभाग किंवा मराठी वाड़मय मंडळ किंवा ग्रंथालये यांनी योजलेला कार्यक्रम असे स्वरुप नसावे.

६ सर्व प्रकारच्या महाविद्यालयांमध्ये, सर्व विभागांच्या सहभागातून कार्यक्रम होतील, याबाबत पाठपुरावा करणे.